लोकसत्ता 'मधली सुट्टी'मध्ये चित्रकार निलेश जाधव यांचे मार्गदर्शन

मुलांना चित्रांशी मैत्री करायला शिकवणारी वेबमैफल

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : रेषा, वर्तुळ, चौकोन, त्रिकोण अशा परिचयातील आकृत्यांपासून आपल्या कल्पनेतील चित्र रेखाटण्याचे सूत्र सहज आणि सोप्या भाषेत लहान मुलांसमोर उलगडले. 'लोकसत्ता'च्या 'मधली सुट्टी' या उपक्रमात शुक्रवारी चित्रकार निलेश जाधव यांनी वेबसत्राद्वारे मुलांना व त्यांच्या पालकांना चित्र कसे काढावे, याचा मूलमंत्र दिला.

लहान मुलांशी गप्पा मारत चित्रकला शिकवताना जाधव यांनी गप्पा मारणारे हत्ती, पळणारे झाड, आंबा, बेडूक, हसणारे मूल अशी विविध चित्रे रेखाटली. ''पाठ्यपुस्तकातील चित्रे पाहून मुलांना विषयाची गोडी निर्माण होत असते. त्यामुळे मुलांच्या जीवनात चित्रांचे महत्व खूप आहे. त्यांच्या मनात अनेक संकल्पना असतात. लहान मुलांनी चित्र काढताना त्याला वास्तवाशी जोडण्यापेक्षा ते कायम त्यांच्या भावविश्वाजवळ जाणारे काढावे. चौकोन, त्रिकोण, वर्तुळ या तीन मुलभूत आकृत्यांभोवती कोणतेही चित्र फिरत असते. चित्र काढण्यापूर्वी रेषा काढण्याचा सराव करावा. मग वक्र रेषा, तुटक रेषा अशा विविध रेषा, आकृत्या यांचा सराव करून त्यात सहजता यायला हवी. सतत चित्र काढताना आपले चित्र अधिक सुधारत जाते. मग आपलेच चित्र पाहून आत्मविश्वास निर्माण होतो. चित्र बोलके होण्यासाठी कल्पनाशक्तीचा, निरीक्षणशक्तीचा कस लागतो. चित्र काढताना चित्त एकाग्र असणे महत्त्वाचे असल्याने मुलांची एकाग्रताही वाढते,'' अशा शब्दांत जाधव यांनी मार्गदर्शन केले.

तेलरंग वापरण्याच्या लहान वयात मुलांना नेहमी जलरंग हवे असतात. मुलांची हीच खोड अचूक हेरून जाधव म्हणाले, ''कोणत्याही चित्राची सुरूवात पेन्सिलने करावी. चुकले तर दुरूस्तीचा पर्याय असतो. शिवाय आपल्या वयानुसार आणि शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार मुलांनी रंगाचा वापर करायला हवा. कारण ते रंग हाताळता यायला हवेत, त्यांच्या सुयोग्य वापराचे तंत्र कळायला हवे. अन्यथा चित्र काढताना रंगसंगती बिघडते, कधी वाटीतले पाणी कागदावर पडते, असे किस्से घडतात.''

या वेळी चित्रकलेविषयी मुलांना पडलेल्या प्रश्नांना निलेश जाधव यांच्यापर्यंत पोहोचवत दुवा साधण्याचे आणि उपक्रमाला अधिक रंजक करण्याचे काम 'लोकसत्ता'च्या प्रतिनिधी स्वाती पंडित यांनी केले.



"चित्र ही आनंद देणारी गोष्ट आहे. मे महिन्याच्या सुट्टीतील चित्रकला ही मुलांसाठी विरंगुळा असली तरी ते रेखाटताना मजामस्ती करत त्या चित्राचा आनंद कसा घेता येईल हे शिकवण्याचा माझा प्रयत्न होता. एकदा चित्रकला आवडू लागली की ती तुमचे व्यक्त होण्याचे माध्यम बनते. पालकांनीही आपल्या मुलांमधील कला ओळखून त्याला आकार द्यायला हवा." निलेश जाधव, चित्रकार

लोकसत्ता मधली सुट्टी

सहप्रायोजक MS-CIT World-class Comprehensive Computer Course

या उपक्रमाचे सहप्रायोजक महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, मर्यादित आहेत

आज बालक आणि पालकांना मार्गदर्शन..

'करोनाकाळातील पालकत्व' या विषयावर बालरोगतज्ज्ञ डॉ. संदीप केळकर संवाद साधणार आहेत. मुलांच्या भावना समजून करोनाकाळात मुलांसोबत संवाद होणे गरजेचे आहे. त्याद्दष्टीने मार्गदर्शन करणारे हे सत्र असेल. मुले आणि पालकांच्या सक्रीय आणि सर्जनशील सहभागातून या लांबलेल्या सुट्टीत ज्ञानवर्धक, मनोरंजक, आणि कलात्मक गोष्टी शिकण्या- शिकवण्याचा प्रयोग याद्वारे केला जाईल.

यू ट्यूबवरूनही... ज्या वाचकांना या कार्यक्रमात झूमवरून सहभागी होता येणार नाही, त्यांना 'लोकसत्ता'च्या यू ट्यूब पेजवर सायंकाळी ४ वाजल्यापासून हा कार्यक्रम पाहता येईल.

मुंबईत १४१६ रुग्णांचे नव्याने निदान

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईत शुक्रवारी १४१६ रुग्णांचे निदान झाले असून ५४ जणांचा मृत्यू झाला आहे. शहरातील रुग्णदुपटीचा कालावधी ३१७ वर गेला आहे.

शहरात शुक्रवारी ३३,७०८ चाचण्या झाल्या. १७६६ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. तर सध्या २९,१०३ रुग्ण उपचाराधीन आहेत. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये ३० जण ६० वर्षांवरील होते. १८ जण ४० ते ६० वयोगटातील तर सहा जण ४० वर्षांखालील होते.

ठाणे जिल्ह्यात ८८७ नवे रुग्ण

ठाणे जिल्ह्यात शुक्रवारी ८८७ करोना रुग्ण आढळून आले, तर, ६१ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला. जिल्ह्यात आतापर्यंत ५ लाख ७ हजार ३१६ करोना रुग्ण आढळले असून ८ हजार ७६८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. कल्याण-डोंबिवलीत २१५, ठाणे १६९, नवी मुंबई १३९, ठाणे ग्रामीण १३६, मीरा-भाईंदर १२७, बदलापूर ४४, अंबरनाथ २८, उल्हासनगर १७ आणि भिवंडीत १२ नवे रुग्ण आढळून आले.

वैद्यकीय परीक्षा १० जूनपासूनच

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे स्पष्टीकरण; ऑनलाइनचा पर्याय अमान्य

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : राज्यात सध्या करोना प्रादुर्भावाची स्थिती गंभीर असली तरी, सुरक्षित वातावरणात येत्या १० जूनपासून वैद्यकीय परीक्षा होणारच, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी स्पष्ट केले.

करोनाच्या कारणास्तव वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लेखी तसेच प्रात्यक्षिक परीक्षा रद्द करणे किंवा ऑनलाइन घेणे नियमाला अनुसरून नाही, न्यायालयानेही त्यास परवानगी दिलेली नाही. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांनी ही बाब समजून घेऊन परीक्षेला सामोरे जाण्यासाठी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यात करोनाच्या पार्श्वभूमीवर १ जूनपर्यंत टाळेबंदी लागू आहे, त्यामुळे २ जूनपासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलून त्या १० जूनपासून घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे, असे देशमुख यांनी या संदर्भाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

करोना प्रादुर्भावात वाढ न झाल्यास त्या परीक्षा सुरक्षित वातावरणात पार पाडण्याचे नियोजन आरोग्य विद्यापीठ व वैद्यकीय महाविद्यालयांनी केले आहे. वास्तविक पाहता वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी भविष्यात डॉक्टर होऊन जनतेच्या आरोग्याची काळजी घेणार आहेत. अशा अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रात भविष्यात काम करण्याची जबाबदारी घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा रद्द करणे किंवा ऑनलाइन घेणे सयुक्तिक ठरत नाही. केंद्रीय नियामक मंडळालाही ते मान्य नाही, शिवाय उच्च न्यायालयानेही ही बाब नाकारली आहे. त्यामुळे परीक्षा घेणे अनिवार्य ठरते आहे. वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाता, प्राचार्य, प्राध्यापक यांनीही या संदर्भाने विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांना मार्गदर्शन करावे परीक्षेसाठी त्यांना प्रेरित करावे असे आवाहन देशमुख यांनी केले.

'विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊ'

मागील वर्षी करोनाचे संकट असताना महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाने परीक्षा यशस्वीरीत्या घेतली असून त्या सुरक्षित वातावरणात पार पडल्या आहेत. १० जूनपासून वेळापत्रकानुसार होणाऱ्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना संपूर्णतः करोना सुरक्षा कवच पुरवले जाणार आहे. त्यांच्या आरोग्याची सर्वतोपरी काळजी घेतली जाणार आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी करावी असे त्यांनी म्हटले आहे.

सिडकोच्या घरांचा ताबा एक जुलैपासून

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : करोना महासाथीमुळे गेली आठ महिने लांबणीवर पडलेला महागृहनिर्मितीतील घरांचा ताबा सिडको एक जुलैपासून देणार आहे. दोन वर्षांपूर्वी सिडकोने १४ हजार ८३८ घरांची सोडत काढली होती. या सोडतीतील लाभार्थींना ऑक्टोबर २०२०पर्यंत ताबा देण्याचे आश्वासन दिले होते मात्र करोनामुळे सिडकोच्या या घरांचे बांधकाम ठप्प झाले. त्यानंतर सिडकोने यंदा काही घरांचे बांधकाम पूर्ण केले असून ग्राहकांना टप्याटप्याने ताबा दिला जाणार आहे. या घरांचे संपूर्ण हप्ते भरणाऱ्या ग्राहकांना पहिल्यांदा हा ताबा दिला जाणार असून त्यांना इतर किरकोळ खर्च भरण्यासाठी जून महिना देण्यात आला आहे.

गृहलाभ झाल्यानंतर सुमारे पाच हजार ग्राहकांनी विविध वित्त संस्थांकडून कर्ज घेतले होते. काही जणांनी कर्जाचे संपूर्ण हप्ते भरले आहेत. करोना साथीमुळे गेल्या वर्षी देशभर टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्यामुळे बांधकामांवरील मजूर त्यांच्या गावी गेल्याने अनेक कामे ठप्प होती. त्याला सिडकोची ही बांधकामेही अपवाद नाही. गेल्या वर्षीही सिडकोने ९२६८ घरांची सोडत काढली आहे. त्यामुळे एकाचवेळी २५ हजार घरांचे बांधकाम सुरू आहे. घरासाठी काढलेले कर्ज आणि भाडे अशा दुहेरी आर्थिक संकटात ग्राहक अडकले असून सिडकोने घरांचा ताबा लवकर द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली होती. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सिडकोने जून जुलैमध्ये घरांचा ताबा दिला जाईल, असे स्पष्ट केले होते. त्यामुळे सिडकोने एक जुलैपासून लाभार्थींना टप्याटप्याने ताबा दिला जाणार अस्ल्याचे सिडकोच्या वतीने शुक्रवारी जाहीर करण्यात आले .

रियाझ काझी बडतर्फ

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : उद्योगपती मुकेश अंबानी धमकी आणि व्यवसायिक मनसुख हिरेन हत्या प्रकरणातील आरोपी, निलंबित सहायक पोलीस निरीक्षक रियाझ काझी यांना शुक्रवारी बडतर्फ करण्यात आले. मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांनी विशेषाधिकार वापरत काझी यांच्या बडतर्फीचे आदेश दिले.

या गुन्ह्यांतील मुख्य आरोपी सचिन वाझे यांना प्रत्येक पावलावर मदत केल्याचे पुरावे हाती येताच राष्ट्रीय तपास यंत्रणेने काझी यांना अटक केली. ते गुन्हे शाखेच्या गुन्हेगारी गुप्तवार्ता विभागात (सीआययू) नेमणुकीस होते. तर या विभागाच्या प्रमुखपदी वाझे यांची नियुक्ती करण्यात आली होती. दोन्ही गुन्हे केल्यानंतर वाझे यांच्या आदेशानुसार काझी यांनी महत्वाचे तांत्रिक पुरावे नष्ट केले, असा आरोप एनआयएने केला आहे.



MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई–मेल आयडी: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक व वार्षिक लेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३१ मार्च २०२१ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२० अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ मार्च २०२० लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२१ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२० लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	२,०७५.२९	२,२५८.९९	२,००५.१८	८,६९७.४३	७,१५६.८९
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींपूर्वी)	८५६.१९	८३०.३९	८०२.५८	३,७२७.३१	२,६७१.५५
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींनंतर)	८५६.१९	८३०.३९	८०२.५८	३,७२७.३१	२,६७१.५५
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींनंतर)	८५८.८४	८३०.३९	८३४.९०	३,७२९.९६	२,७९२.१५
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर)आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	८६७.५२	८२३.८८	८३३.७९	३,७३३.०९	२,७८०.४०
६. समभाग भांडवल (₹१०/– प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्यालेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	–	–	–	(१६,२५७.६१)	(१८,७५०.८४)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/– प्रत्येकी)*					
मूलभूत (₹)	०.३६	०.३५	०.३५	१.५५	१.१६
सौमिकृत (₹)	०.३६	०.३५	०.३५	१.५५	१.१६

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

सूचना:

१. वरील तक्ता त्रैमासिक व वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.

२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून दिनांक २१ मे, २०२१ रोजी केले गेले आहे आणि दिनांक २१ मे, २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/–
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: २१ मे, २०२१